# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE
REACHING NATIONS

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXVI YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2024 NOVEMBER No. 10


## पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

नीतिसूत्रे : २६:१-१०

१. उन्हाळ्यांत जसे बर्फ, कापणीच्या समयी जसा पाऊस, तसा मूर्खाला सन्मान शोभत नाही.

२. भ्रमण करणारी चिमणी व उडणारी निळवी याप्रमाणे निष्कारण दिलेला शाप कोठेच ठरत नाही.

३. घोड्याला चाबूक, गाढवाला लगाम, मूर्खाच्या पाठीला बडगा.

४. मूर्खाला त्याच्या मूर्खतेप्रमाणे उत्तर देऊ नको, देशील तर तूं त्याच्या सारखा ठरशील.

५. मूर्खाला त्याच्या मूर्खतेला योग्य असे उत्तर दे, नाही तर तो आपल्या मते स्वता:ला शहाणा समजेल.

६. जो मूर्खाच्या हाती निरोप पाठवितो तो आपले स्वतां:चे पाय कापून घेतो, त्याचे नुकसान त्याच्या पदरी पडते.

७. लंगड्याचे पाय जसे कमजोर तसे मूर्खाच्या तोंडचे नीतिवचन असते.

८. मूर्खाला मान देणारा गोफणीत गोटा घट्ट बांधणाऱ्यासारखा आहे.

९. मूर्खाच्या तोंडचे नीतिवचन, झिंगलेल्या इसमाच्या हातांत शिरणाऱ्या काट्यासारखे आहे.

१०. कुशल कारागीर सर्व वस्तु सिद्ध करितो; आणि जो मुर्खाला कामास लावितो. तो कोणाहि आल्या गेल्यास कामास लावणाऱ्या सारखा आहे.

# ✲ एकमेकांची ओझी वाहणे ✲


*मानद् प्रमुख संपादक*

*रेव्ह. ॲन्जेलाइन सेल्वाकुमारी*


**BEAR EACH OTHER'S BURDEN!** (Galatians 6:2)



ज्याचे प्रेम अमर्याद, बिनशर्त आणि वादरहित आहे अशा आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या नामात तुम्हां सर्वांना शुभेच्छा. या २०२४च्या पहिल्या दहा महिन्यात आम्हाला उचलून धरले – आधार दिला त्या त्याच्या कृपा आणि मेहरनजरे बद्दल देवाचे आभार मानितो. आपण त्याची लेकरें आहोत, त्यामुळे तो आपले मार्गदर्शन करीत राहिल आणि त्याची कृपा आपल्याला नेहमीच पुरेशी असणार.

बायबल आपल्याला सांगते, कि त्याने आपल्याला त्याची लेकरें होण्याकरिता बोलाविले आहे. किती हा विशेष अधिकार! परंतु महत्त्वाचा प्रश्न हा आहे, "आपले जीवन त्याच्या पाचारणास योग्य असे आहे?" इफिसकरास पत्र लिहीताना पौल लिहितो, "**...मी तुम्हांस विनंति करितो की तुम्हांस झालेल्या पाचारणास शोभेल असे तुम्ही चालावे.**" (इफिस ४:१). याचा अर्थ आहे? हे वाक्य माझ्या मनांत अनेक दिवस रेंगाळत होते. त्याच्या पाचारणास शोभेल असे चालावे याचा खरा अर्थ काय? आपणांस नेमके काय करण्यास पाचारण करण्यात आले आहे? जरी याला अनेक दृष्टिकोन असतील, चला आपण एकावर लक्ष केंद्रित करु या.

(...पान ३ वर)




एको ऑफ हिज कॉल

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !

पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

पाच मिनिटांचा संदेश

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून

रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

✲ कृपा करुन सबक्राईब करा ✲

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS

## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...





### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
HON. MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM., MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.

EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858
95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

**''परमेश्वर किती चांगला आहे याचा अनुभव घेऊन पाहा; त्याजवर भाव ठेवितो तो पुरुष धन्य!'' - (स्तोत्र ३४:८)**

ख्रिस्त येशूमधील देवाच्या अति प्रिय लेकरांनो,

तुमचे चांगले जीवन अधीक समृद्ध होवो याकरिता परमेश्वराच्या मंदिरांतून आम्ही तुम्हांस आशीर्वाद देतो (स्तोत्र ११८:२६)

जरी सेवेच्या काही विभागांत अडथळे, आजार, आर्थिक संकट अशी परिस्थिती असताना देखील, **एको ऑफ हिज कॉलच्या** आमच्या सर्व सहकार्यांन---बद्दल आम्ही देवाचे आभारी आहोत. पौल प्रे.कृ. २७:२२ वचनात म्हणतो. ''तुम्हातील कोणाच्याहि जीवाचा नाश होणार नाही. तारणाचा मात्र होईल.'' त्याप्रमाणे देव आम्हांस सांभाळीत आहे. सुरक्षित ठेवित आहे आणि मार्गदर्शन करीत आहे.

आमचे सहकारी सेवकांना प्रकृति स्वास्थ्य लाभले असल्यामुळे आम्हाला स्थानिक प्रवास करणे शक्य झाले आहे. ''**धार्मिक सात वेळा पडला तरी पुन: उठतो.**'' - नीतिसूत्रे २४:१६ या वचनानुसार देवाने आम्हाला वर उठविले आहे. त्यामुळे हा संपूर्ण नोव्हेंबर महिना आशीर्वादांनी भरलेला असेल अशी आशा आहे.

मुख्य कार्यालयातील आमच्या सहकर्मचारी, डॉ. सेरिना बेवीन, साजीनी चेरियन, रेव्ह. डॉ. के.आर. राजशेखरन, रेव्ह. डॉ. रॉबर्ट विल्यम आणि १६ भाषांमधील इतर सर्व सहसंपादक, समन्वयक, तसेच आमची मासिकाची सेवा सुरु ठेवणारा मुद्रणालयीन कर्मचारी वर्ग अशा सर्वांकरिता तुमच्या प्रार्थनांची अपेक्षा करीत आहोत. या सर्वांच्या उत्तम प्रकृति स्वास्थ्यामुळेच आम्ही मासिक दर महिन्याला नियमितपणे प्रकाशित करु शकतो.

कृपया आमची सर्व देवाची लेकरे, जी **नहेम्या बायबल कॉलेज, सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल,** मुद्रणालय, यूट्युब सेवा, मिशनक्षेत्र आणि कार्यालयात काम करीत आहोत त्यांची तुमच्या प्रार्थनेत आठवण ठेवा.

विशेषत: आम्ही तुम्हाला कळवू इच्छितो, कि आमची सेवा आर्थिक संकटांतून जात असल्यामुळे आमच्या सर्व गरजा आम्ही पूर्ण करु शकत नाहि. कृपया प्रार्थना करा.

तुम्हा सर्वांचा विपुल आशीर्वाद मिळोत.

प्रार्थना आणि प्रेमासहित.

ख्रिस्त येशूमध्ये तुमचे दास

ॲलेक्स सॅ मसन सॅम

पास्टर एस्. सॅम सेल्व राज

(+91) 98412 71858 / 98410 71858, E.mail : sam@echoofhiscall.org

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) YouTube Ministry Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

## त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी मासिकाच्या वाचकांनो - लक्ष द्या

आमचे **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलवर आमचे ५ मिनिटांचे मननपर संदेश दररोज पहाटे २.०० वाजता तामिळ, तेलगू, इंग्रजी आणि हिन्दी या भाषांमध्ये प्रसारीत होत असतात. ते संदेश ऐकून तुम्ही देवाची कृपा प्राप्त करु शकता.

आणखी माझे मोबाईल क्रमांक ९८४१०७१८५८, आणि ९८४१२७१८५८ (वैयक्तिक) तुमच्या मोबाईलमध्ये जतन करुन ठेवा.

**- पास्टर एस्. सॅम सेल्वा राज**

(पान १ वरुन...)

### शांति करणारे: देवाची लेकरें :-

मत्तय ५:९ **"शांति करणारे ते धन्य, कारण त्यास देवाचे पुत्र म्हणतील."** यावर मनन करु या. प्रिय बंधुनो आणि बहिणींनो, आपली इच्छा असेल कि आपल्याला देवाची लेकरे बोलले जावे आणि आपण त्याच्या पाचारण्यास योग्य जीवन जगावे, तर आपण शांति करणारे असावे. हा देवाच्या लेकरांच्या स्वभावगुणाची गुरुकिल्ली आहे. त्याने आपणास आपण शांति करणारे व्हावे याकरिता पाचारण केले आहे. असंतोष घडविण्यास नाहि.

इफिस ४:२ हे वचन आपणांस आपण देवाची लेकरें या नात्याने एकमेकांचे सहन करुन शांति करणारे बनावे म्हणून पाचारण करण्यात आले आहे. हे करण्यासाठी आपण नम्र, शांत-कोमल आणि सहनशील असावे. या सद्‌गुणांचा सराव केवळ आपल्या सहविश्वासणाऱ्यां बरोबरच केवळ नाहि तर जे आपल्या सहनशीलतेची परिक्षा घेतात आणि दररोज कठोर शब्द वापरतात आणि दु:ख देणाऱ्या कृति करितात. त्यांच्या बाबतीत देखील खरोखर हे करणे कठीण आणि आवाहान ठरु शकते. हे बोलणे फार सोपे आहे; परंतु जगणे नाहि. तरी देखील येशू वर प्रेम करण्याऱ्याकडून बायबल अगदि तंतोतंद हिच अपेक्षा करते. प्रेक्षित याकोब आपण वचनाप्रमाणे आचारण करणारे असावे. केवळ ऐकणारे असू नये यावर भर देतो.

### एकमेकांची ओझी वाहणे!

कलस्सै ३:१३ आपणांस शिकविते, **"एकमेकांचे सहन करा, आणि कोणा विरुद्ध कोणाचें गाऱ्हाणे असल्यास आपसांत क्षमा करा; प्रभूनें तुम्हाला क्षमा केली तशी तुम्हीहि करा."**

एकमेकांचे सहन करण्यास क्षमेची गरज असते. खरी क्षमा करण्यास प्रीति आवश्यक असते आणि देवाची प्रीति असल्या शिवाय आपण खऱ्या अर्थाने क्षमा करु शकत नाही. किंवा विसरु शकत नाही; "हे कठीण आहे; मला ते करता येत नाही. मी एक भावना आणि संवेदना असलेला सामान्य मानव आहे. मला ते अशक्य आहे." परंतु निच्छितच याच करीता आपल्याला प्रीती आणि क्षमा करण्यास देवाची मदत हवी आहे. एकमेकांची ओझी वाहा हि एक सुचना किंवा पर्याय नसून ती आज्ञा आहे. गलती ६:२ आपल्याला सांगत आहे, **"एकमेकांची ओझी वाहा, म्हणजे तुम्ही ख्रिस्ताचा नियम पूर्ण कराल."**

ख्रिस्ताचा नियम पूर्ण करण्यास, आपण एकमेकांनची ओझी वाहाण्यास मदत केली पाहिजे. प्रत्येक व्यक्ति अडचणींना सामोरी जाते. आवाहने, दडपून टाकणाऱ्या परिस्थिती, आर्थिक धडपड, पापा बरोबर युद्ध आणि शारिरीक व आत्मिक परिक्षा तथापी, हि ओझी आपण एकट्यानेच वाहावयासाठी नाहित, त्याकरिताच देवाने आपणाला मंडळी हे कुटुंब दिलेले आहे. आपण ख्रिस्तामध्ये एक शरिर आहोत आणि शरिराचा एक अवयव दुखावला तर संपूर्ण शरिर दुखावले जाते.

### क्रुसचे सांकेतीक चिन्ह !

आपण बहुतेक वेळा देवाबरोबर असणाऱ्या आपल्या त्याच्या नातेसंबधाला महत्त्व दे-साठी त्याच्या बरोबर शांति राखण्यावर लक्ष केंद्रीत करित असतो. तथापी क्रुसाच्या चिन्हात दोन रेषा समाविष्ट असतात. उभी रेषा आणि आडवी रेषा. उभी रेषा आपला देवाबरोबर असलेला संबंध दर्शविते, तर आडवी रेषा आपल्या इतरांबरोबर असलेल्या संबंध दर्शविते.

येशूच्या दोन महत्त्वाच्या आज्ञांचे देखील असेच आहे पहिली, **"तू आपला देव परमेश्वर याजवर पूर्ण अंत:करणाने, पूर्ण जिवाने व पूर्ण मनाने प्रीति कर."** (मत्तय २२:३७). आपल्या देवाशी असलेल्या संबंधा बद्दल बोलते. (उभी रेषश). दुसरी, **"...तूं आपल्या शेजाऱ्यावर आपणासारखी प्रीति कर."** (मत्तय २२:३९). मत्तय २२:३४-४० आपल्या इतरांबरोबर असलेल्या संबंधा विषयी आसतात (आडवी रेषा).

आपल्या पैकी अनेकजण देवाबरोबरच्या संबंधात समाधानी असतात. आपली देवावर प्रीति असते, त्याचे वचन दररोज वाचतो, प्रार्थना, उपास, उपासनेला हजर रहातो. आणि सेवाकार्यात सहभागी होतो आणि आत्म्याच्या दानांना महत्त्व देतो. जसे पौल १ करिंथ १२:८-१० या वचनात लिहितो, **"एकाला आत्म्याच्या द्वारे ज्ञानाची शक्ति मिळते; एकाला त्याच आत्म्यानुसार विद्येची उक्ति; एकाला त्याच आत्म्यात विश्वास, एकाला त्याच एका आत्म्यात निरोगी करण्याची कृपादानें; एकाला अद्‌भूत कार्ये करावयाची शक्ति; एकाला संदेशशक्ति; एकाला आत्मे ओळखण्याची शक्ति; व एकाला भाषांचा अर्थ सांगण्याची शक्ति मिळते."**

तरी सुद्धा, आत्म्याच्या फळांबद्दल काय? गलती ५:२२-२३ हि वचने आपल्याला आठवण करुन देतात, **"आत्म्याच्या प्रभावाने होणारी फलप्राप्ति प्रीति, आनंद, शांति, सहनशीलता, ममता,**

**चांगुलपणा, विश्वासूपणा, सौम्यता, इंद्रियदमन ही आहेत...''.** पुष्कळदा माझ्या पहाण्यात असे येते, कि लोक त्यांच्या सेवाकार्यात आणि देवाशी व्यक्तिगत संबंध राखण्यात इतके क्षीण होत असतात कि त्यांचे त्यांच्या कुटुंबाकडे आणि शेजाऱ्यांकडे दुर्लक्ष होते. बायबल आम्हाला शिकविते कि दोनहि संबंध सारखेच महत्त्वाचे आहेत.

## मंडळीची जबाबदारी !

मंडळी, ज्या मध्ये तुम्ही आणि मी आहोत, त्यांच्यावर सहविश्वासणाऱ्यांची काळजी घेण्याची आणि त्यांची ओझी वाहाण्याची गंभीर अशी जबाबदारी आहे. शरिराचा एक सदस्य आजारी असतो, तेव्हा त्याच्या परिणाम आपल्या सर्वांवर. इतरांची काळजी घेणे हि केवळ दया दाखविण्याची कृति नाही. तर त्यामध्ये आधाराचा सामावेश असतो. आपल्या सभोवती असणारे सुदृढ प्रकृतिचे असतात. आपल्याला त्यांचा लाभ मिळतो आणि आपण सुदृढ असतो, तेव्हा पूर्ण मंडळीला बळ मिळते. संभाषणाने आपण दु:खी होतो, जे आपल्या जवळचे असतात, मंडळी सहित सर्वांवर आघात होतो.

गलती ६:२ या वचनात म्हटल्यानुसार, **''एकमेकांची ओझी वाहा, म्हणजे तुम्ही ख्रिस्ताचा नियम पूर्ण कराल.''** हि आज्ञा अगदी स्पष्ट आहे – ती ऐच्छिक नाहि, तर देवाच्या कुटुंबातील प्रत्येक सदस्याला सरळ सरळ अधिकृत नियम आहे. असे केल्यानेच आपण देवाची लेकरे या नात्याने बोलाविल्या प्रमाणे जगतो. आता आपण इतरांनी एकमेकांची ओझी कशी वाहिली ते पहाण्यास वचनाकडे वळू या.

## दाविद आणि योनाथान!

दाविद आणि योनाथान या दोघांमधील करार हे निस्वार्थी प्रेम आणि मैत्रीचे लक्षणीय असे उदाहरण आहे. दाविद मी ज्या स्थानावर असावयास हवे, ती राजाची जागा एक दिवस घेणार हे माहित असताना देखील, योनाथानाने दाविदावर अंत:पूर्ण रित्या प्रेम केले. त्याची दाविदा प्रति असलेली इमानदारी इतकी महान होती की तो आपला पिता शौल राजा याच्या विरोधात उभा राहिला.

१ शमुवेल २३, एक शक्तिशाली क्षण नोंद करीत आहे. दाविद जीफ नावाच्या रानांत लपला; शौल निर्दयीपणे दाविदाचा वध करण्याकरिता त्याचा पाठलाग करीत होता. तथापी बायबल आपल्याला सांगते, **''...पण देवाने त्यास त्याच्या हाती लागू दिले नाही.''** (१ शमुवेल २३:१४). देव दाविदाचे रक्षण करीत होता.

प्रिय मित्रांनो, किती हे समाधान देणारे सत्य देवाने दाविदाचे रक्षण केले; तर तो जे आपले शत्रू आपल्याला खाली पाडण्याची इच्छा करितात त्यांच्या पासून आपले रक्षण करील. काहि वेळा असे वाटेल कि आपल्यावर सतत हल्ला होत आहे; परंतु आपण हे लक्षात ठेवले पाहिजे, की देव आपल्याला शत्रूच्या हाती देणार नाही. आपले मार्ग देवाला संशोषविणारे असतात, ते आपल्या शत्रूंना आपल्या भल्याकरिता काम करण्यास बदलू शकतात. शत्रू कदाचीत जवळ असेल; परंतु देव नियंत्रण करीत आहे. देव आपल्याला त्यांच्या हातात कदापी पडू देणार नाही.

शौल त्याचा शोध करीत आहे, हे ठाऊक असल्यामुळे दाविद भितीमध्ये जीवन जगत होता. त्याला आपल्या कुटुंबापासून त्याच्या पत्नी, मित्र आणि घराच्या समाधाना पासून दूर रानात असल्यामुळे एकाकी, निराश आणि चिन्तातुर वाटत असेल. एकाकीपण एक भीतिजनक शत्रू असू शकतो, जो नकारात्मक विचारांचे मूळ रुजु देण्यास आणि वाढविण्यास परवानगी देवू शकतो. तथापी अशा या अंधकारमय क्षणांत, देव दाविदा सोबत होता आणि तो आमच्या सोबत देखील आहे.

दाविद, रानांत शारिरीक, मानसिक आणि आत्मिक स्थितीत खालावलेला होता, अशावेळी त्याचकडे एक अनअपेक्षित पाहुणा आला :- **''तेव्हा शौलाचा पुत्र योनाथान हा निघून दाविदाकडे त्या उंचवट्यावरील आडीत गेला; देवाच्या हाथी त्याचा भरवसा दृढ करुन त्याच्या हाताला बळकटी दिली.''** (१ शमुवेल २३:१६) या वचनाचे इतर भाषांतर.

**NIV देवामध्ये बळ शोधण्यास मदत केली.**

**NLT देवावरील त्याच्या विश्वासात भक्कम राहा.**

**KIV देवामध्ये त्याच्या हातास बळकटी दिली.**

**Amplitied देवामध्ये त्याला उत्तेजन दिले.**

(...पान ६ वर)

नहेम्या निवासी बायबल कॉलेज
चेन्नाई
ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS
प्रवेशा करिता त्वरा करा !
ईश्वरविद्या डिप्लोमा
माध्यम : हिंदी
शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक
आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५५ वर्षांपासून मान्यता प्राप्त
संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
✼ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ✼

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ नोव्हेंबर ते १८ डिसेंबर २०२४ पर्यंत

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

१९ नोव्हेंबर : **नहेम्या बायबल कॉलेज**चे २०२४-२०२५चे पहिले सत्र यशस्वीरित्या पूर्ण करून दुसरे सत्र सुरु करण्यास मदत केल्याबद्दल.

२० नोव्हेंबर : आमच्या मुद्रणालयाचा उपयोग करुन, १६ भाषेंतील मासिक छापून ते मिशन क्षेत्रांना वितरीत करणे शक्य होऊ दिले.

२१ नोव्हेंबर : पत्रव्यवहारा द्वारे करण्यात येत असलेल्या **बायबलकोर** आणि **थियॉलॉजीकल अभ्यासक्रमा**वरील त्याच्या आशिर्वादाबद्दल.

२२ नोव्हेंबर : आमच्या मुख्य आणि शाखा मंडळ्यांमधून संपर्कात न आलेल्या गटांना सुवार्ता संदेश दिला जात आहे.

२३ नोव्हेंबर : नानाविध सेवांच्या द्वारे न खचता शुभवर्तमान गाजविणाऱ्या आमच्या वरिष्ठ पास्टरांच्या समर्पितपणाबद्दल.

२४ नोव्हेंबर : आमच्या **एको ऑफ हिज कॉल** मासिक सेवेकरिता समर्पित सहसंपादक पुरवून आशीर्वादीत केल्याबद्दल.

२५ नोव्हेंबर : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार, महान आज्ञापालनातील भागीदार यांच्या वरील त्याच्या दयेबद्दल.

२६ नोव्हेंबर : आमच्या सेवेत सक्रीय सहभाग घेऊन नियमितपणे आधार देत असलेल्या सर्वांबद्दल.

२७ नोव्हेंबर : समर्पित शब्बाथ शाळा शिक्षक.

२८ नोव्हेंबर : आमच्या **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनल सेवेचे अध्यक्ष बंधु एडवर्ड दुराई

२९ नोव्हेंबर : संपर्कात न आलेल्या विभागांना **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब माध्यमाद्वारे सुवार्ता प्रसार करण्यासाठी मदत केली.

३० नोव्हेंबर : आमच्या मुख्य आणि शाखा मंडळ्यांच्या शब्बाथ शाळेसाठी आणखीन मुले देऊन आशीर्वादीत केले.

०१ डिसेंबर : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल** आणि **नहेम्या बायबल कॉलेज**च्या विद्यार्थी आणि शिक्षकांना दैवी सुरक्षा पुरविल्याबद्दल.

०२ डिसेंबर : आमचे हितचिंतक, मित्रगण आणि सेवा क्षेत्रांना पाठबळ देणारे.

०३ डिसेंबर : **एको ऑफ हिज कॉल**च्या सर्व कार्यक्रमांना त्याच्या मार्गदर्शन आणि आशीर्वादाबद्दल.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

०४ डिसेंबर : आमचे वरिष्ठ पाळक एस्. सॅम सेल्वाराज आणि त्यांच्या कुटुंबाचे सर्व दुष्ट शक्तिपासून रक्षण व्हावे.

०५ डिसेंबर : वरिष्ठ पाळकांना त्यांचे आत्मचरित्र लिहून पूर्ण करण्यात यशस्वी व्हावेत.

०६ डिसेंबर : जगभरातील सर्व पाळक, मिशनरी आणि ख्रिस्ती संस्थाच्या रक्षणाकरिता.

०७ डिसेंबर : मासिकाच्या कार्यकारी मंडळा करीता.

०८ डिसेंबर : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल** आणि **नहेम्या बायबल कॉलेज**चे शिक्षक आणि विद्यार्थी या सर्वांकरीता.

०९ डिसेंबर : तारुण्यात प्रवेश करणाऱ्या आणि तरुणावस्थेतील मुलां-मुलींत आत्महत्या करण्याची असलेली प्रवृत्ती नष्ट व्हावी.

१० डिसेंबर : जगभरात वादळ, भूस्कलन आणि भूकंपासारख्या घडत असलेल्या नैसर्गिक आपत्ती परिस्थितीस प्रतिबंध व्हा.

११ डिसेंबर : आमच्या मंडळीच्या कार्यकारी सभासदांकरिता.

१२ डिसेंबर : शाळेच्या कार्यकारी सभासदाकरिता.

१३ डिसेंबर : नव-नवीन उत्पन्न होत असलेला संसर्गजन्य आजारांपासून रक्षण व्हावे.

१४ डिसेंबर : जगभरातील ख्रिस्ती सेवाकार्याच्या पुनरुज्जीवनाकरिता.

१५ डिसेंबर : जगभरातील युद्ध आणि दहशदवादि परिस्थिती बदलून शांति आणि सलोख्याची स्थिती पुर्ववत व्हावी.

१६ डिसेंबर : नहेम्या बायबल कॉलेजच्या कार्यकारी मंडळाकरिता.

१७ डिसेंबर : चुकीच्या शिकवणी आणि चमत्कारा पासून विश्वासीजनांचे रक्षण व्हावे.

१८ डिसेंबर : दवाखान्याच्या (रुग्ण भेटी) सेवेकरिता.

(पान ४ वरुन)

थोडक्यात, योनाथान रानात त्याच्या प्रिय मित्र दाविदाला भेटण्यास गेला आणि त्याला हिम्मत दिली. त्याच्या अशक्तपणात त्याच्याशी उत्तेजनपर शब्द बोलून त्याला बळ दिले. योनाथानाच्या शब्दाचा दाविदाच्या मनावर अनाकलनीय असा प्रभाव पडला. १ शमुवेल २३:१७. या वचनात योनाथान बोलतो **"भिऊ नको; माझा बाप शौल याच्या हाती तूं लागावयाचा नाहीस; तु इस्त्राएलाचा राजा होणार व मी तुझा दुय्यम होणार; माझा बाप शौल यालाहि हे ठाऊक आहे."**

योनाथानाने दाविदाला देवाच्या त्याच्या जीवनाबद्दलच्या योजने बद्दल पुन: एकवार आश्वासन दिले. योनाथानाला त्याच्या स्वत:च्या पित्याच्या चुका कबूल करणे किती कठीण गेले असेल याची कल्पना करा. शौल शक्तिशाली राजा जरी असला; तरी त्याने कितीहि जोरदार प्रयत्न केले; तरी देखील तो देवाची इच्छा निष्फळ करु शकला नाही. देवाने दिलेले वचन-आश्वासन पूर्ण होणार हे ओळखून योनाथानाने दाविद पुढील राजा होणार हे कबूल केले आणि त्याच्या दुय्यम म्हणून काम करण्याची इच्छा व्यक्त केली. मानवाची कोणतीहि योजना, नरकाची कोणतीहि लबाडी हि देवाच्या उद्दीष्ठाच्या विरोधात पुढे येऊ शकत नाही. आपल्या करिता देवाची योजना आहे. यिर्मया २९:११ **"...तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत."**

योनाथान दाविदास उत्तेजन देण्यासाठी त्याच्या मार्गापलिकडे गेला, हे त्याचे कृत्य आपल्याला आठवण करुन देत आहे कि, आपण इतरांना उत्तेजन देतो, तेव्हा ते प्रभुमध्ये शक्तिशाली बनतात. कोणाला तरी उत्तेजन देण्याकरिता तुम्ही बाहेर गेला होता, ती शेवटची वेळ केव्हाची होती? आपण बहुतेकदा स्वत:करिता उत्तेजन शोधतो, परंतु इतरांना त्याची गरज असते. अशावेळी आपण त्यांना उत्तेजन देण्याचा प्रयत्न करतो कां? सध्याच्या व्यस्त जगात इतरांच्या गरजांकडे दुर्लक्ष करणे सोपे आहे. कधी कधी आपल्याला वाटते, पैसे पाठविणे पुरे आहे. आर्थिक मदत करण्याबरोबरच शारिरीक आणि भावनिक मदत करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

## बर्जिल्ल्य :-

बायबलमधील एक दुसरी प्रेरणा देणारी व्यक्ति बर्जिल्ल्य, ज्याने सिद्ध करुन दाखविले कि वय हि केवळ संख्या आहे. २ शमुवेल १८:३२ वचनात सांगितले आह, **"बर्जिल्ल्य फार वयातीत होता; त्याचे वय ऐंशी वर्षांचे हेते. राजा महनाइम येथे तळ देऊन राहिला होता तेव्हा बर्जिल्ल्यानें त्यास अन्न-पाणी पुरविले होते; तो फार मोठा मनुष्य होता."**

आपण ऐंशी वर्षे वयाच्या बर्जिल्ल्या या वृद्ध माणसाला पाहातो. दाविद त्याच्या मुलापासून दूर रानात त्याच्या लोकांबरोबर पळत असताना त्याला अन्न आणि इतर साधन सामुग्रीची निकडीची गरज होती. बर्जिल्ल्या या वृद्ध धनवान माणसाने दाविद आणि त्याच्या माणसांना आधार देण्याचा पुढाकार घेतला. त्याने ते सर्वजण महनाइम येथे तळ देवून राहात असताना त्यांना अन्न पुरवून त्यांचे ओझे वाहिले.

हि गोष्ट स्पष्ट करिते, की दयाळूपणाच्या कृति या लिंग, विशिष्ट जात किंवा वय यांनी मर्यादित नसतात तर कोणीहि इतरांची ओझी वाहू शकतो. प्रामुख्याने आवश्यकता असते; ती म्हणजे इच्छा आणि कनवाळू-दयाळू हृदय. दाविदाने बर्जिल्ल्यास त्याच्या दयाळूपणाबद्दल प्रतिफळ देण्याकरिता, त्याजसह यरुशलेमात येण्यासाठी सांगितले, बर्जिल्ल्यानें नम्रतेने नकार दिला व मागे रहाणे पसंद केले. यावरुन हे प्रदर्शित होते की त्याचे प्रेम आणि काळजी निस्वार्थी होती. त्याला केवळ दाविदासाठी तेथे राहून त्याच्या वेदना आणि धडपड यात भाग घ्यावयाचा होता.

## JESUS CHRIST!

येशू ख्रिस्ताच्या निस्वार्थी प्रेमाच्या उदाहरणापेक्षा दुसरे मोठे उदाहरण नाही. त्याची आपल्या वरिल प्रीति इतकी गहन आहे, कि आपल्या पापांकरिता क्रुसावर प्राण अर्पण करण्यास स्वर्ग आणि राजासन सोडण्यास तयार झाला. **"...तुझ्या लीनतेमुळे मला थोरवी प्राप्त झाली आहे."** (स्तोत्र १८:३५) येशूने स्वत: लिन झाला झाला आणि आपण आशीर्वादीत व्हावे यासाठी तो शाप असा झाला. आमची लज्जा त्याने स्वत: सहन केली अशा साठी की आपल्याला ताठ मानेने चालता यावे. त्याच्या बलीदाना द्वारे, आपल्याला पापांची क्षमा आणि अनंतकालीक जीवनाची सर्वोच्य भेट प्राप्त झाली. तो अभिवचन देतो, **"मी तुला सोडणार नाहीच व तुला**

(...पान ९ वर)

नहेम्या बायबल सांध्य कॉलेज
चेपॉक आणि संतोषपुरम, चेन्नाई
ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE
REACHING NATIONS
प्रवेश करिता त्वरा करा !
माध्यम : तमिळ
शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक
ईश्वरविद्या डिप्लोमा
संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५५ वर्षांपासून मान्यता प्राप्त
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
✲ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ✲

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना सेवा | : २४ तास |
| २. | **एको ऑफ हिज कॉल** | : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन |
| ३. | **बायबलकोर** | : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी) |
| ४. | पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम | : इंग्रजी आणि तामिळ |
| ५. | नहेम्या बायबल कॉलेज | : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी) |
| ६. | महान आज्ञापालनाचे भागीदार | : (पाळकांचे नेटवर्क) |
| ७. | प्रशिक्षण कार्यक्रम | : सेमिनार आणि रीट्रीटो |
| ८. | महासभा | |
| ९. | छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा | |
| १०. | शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय | : प्रकाशने |
| ११. | सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल | : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल |
| १२. | रवीवारी शब्बाथ शाळा (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम) | : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी |
| **१३.** | **सकाळची उपासना** | **: रविवारी सकाळी ५.३० वाजता** |
| **१४.** | **सुरुवातीची उपासना** | **: रविवारी सकाळी ८.०० वाजता** |
| **१५.** | **तामिळ उपासना** | **: रविवारी सकाळी ८.३० वाजता** |
| **१६.** | **युवा सभा** | **: रविवारी दुपारी ११.०० वाजता** |
| **१७.** | **सहभाग भोजन** | **: रविवारी दुपारी १.०० वाजता** |
| **१८.** | **हिन्दी उपासना** | **: सायंकाळी ४ वाजता - रविवारी** |
| **१९.** | **तेलगु उपासना** | **: सायंकाळी ५ वाजता - रविवारी** |
| **२०.** | **इंग्रजी आणि हिंदी उपासना** | **: सायंकाळी ६ वाजता - रविवारी** |
| २१. | अभिप्रायाची वेळ | : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी |
| २२. | स्त्रियांची प्रार्थना | : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी |
| २३. | पुरुषांची प्रार्थना | : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी |
| २४. | शिष्यत्वाची सभा | : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी |
| २५. | गृह प्रार्थना सभा | : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी |
| २६. | विशेष प्रभु भोजन | : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी |
| २७. | सेवाकाची समालोचन सभा | : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार६ |
| २८. | पालकांची प्रार्थना | : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार |
| २९. | रात्रभर प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार |
| ३०. | उपास प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार |
| ३१. | पवित्र सहभागिता | : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत |
| ३२. | तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना | : दररोज रात्रो १० वाजता (फोन द्वारा) |
| ३३. | कार्यालयीन स्टाफचे मनन | : सकाळी ९ वाजता - दररोज |
| ३४. | कार्यालय | : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून) |

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### केवळ भारतातील उमेदवारां करीता

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

*अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -*

**अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज**
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | : **Echo of his call Educational Trust** |
| **Account Number** | : **1023 2923 805** |
| **Bank Name** | : **State Bank Of India** |
| **Branch** | : **Triplicane, Chennai - 600 005.** |
| **IFSC Code** | : **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**"नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !" (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**



## एका पेन्सिल चटईची जुनी गोष्ट

**"मुलाच्या स्थितीस अनुरुप असे शिक्षण त्याला दे, म्हणजे वृपणीहि तो त्यापासून परावृत्त होणार नाही." (नीतिसूत्रे २२:६)**

माझे इयत्ता ५वी पर्यंतचे शिक्षण खेड्यातील शासकीय शाळेत पूर्ण झाल्यानंतर मला पुढील शिक्षणाकरिता हायस्कूलमध्ये प्रवेश देण्यात आला, जेथे मला प्रथमच इंग्रजी मुळाक्षरे शिकविण्यात आली. शाळेच्या पहिल्याच दिवशी वर्ग शिक्षीकेने सर्व विद्यार्थ्यांना उद्या पेन्सील आणि वही घेऊन येण्या विषयी सुचना दिली. मी शाळेतून घरी पोहचल्या बरोबर या गरजेबद्दल माझ्या आईला सांगितले; कारण माझे वडील दुसऱ्या गावाला गेले होते. तिला वही मिळविता आली परंतु ती पेन्सील खरेदी करु शकली नाही. तीला शेजारी असणाऱ्या नातेवाईकांकडे मदत मागणे नको होते. मजकडे तिने असमर्थता व्यक्त केली व मी प्रभु येशू ख्रिस्ताकडे; त्याने पेन्सील पुरविण्या करीता प्रार्थना करण्यास सांगितले.

तिने सांगितल्याप्रमाणे मी रात्री गुडघे टेकून देवाकडे त्याने मला पेन्सील द्यावी अशी प्रार्थना करुन झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत देवाने मला पेन्सिल दिली नाही. त्यामुळे पेन्सिल शिवाय मला शाळेत जावे लागले. वर्गातील इतर सर्व मुलें शिक्षीकेने सांगितल्यानुसार पेन्सिल व वही घेऊन आले होते. मीच एकटा विद्यार्थी पेन्सिल शिवाय होतो. त्यामुळे त्या माझ्या विषयी नाराज होत्या. आणि मी पुढील दिवशी पेन्सिल शिवाय शाळेत येऊ नये असे त्या बोलल्या.

अतिशय दु:खीत मनाने मी ती बातमी आईला सांगितली. त्यावर ती मला म्हणाली तू **पेन्सिल देण्याविषयीची केलेली प्रार्थना** प्रभु येशू ख्रिस्ताने ऐकल्याबद्दल त्याचे आभार मान. मी मध्य रात्रीपर्यंत प्रभुचे आभार मानित राहिलो. उद्या मी पेन्सिल न घेताच शाळेला जावे लागले; तर मला शिक्षेला सामोरे जावे लागेल या विचाराने मला झोप येत नव्हती.

अचानक मध्य रात्री कोणीतरी आमचे दारावर टकटक करीत असल्याचे ऐकू आले, मला आश्चर्य वाटले. आईने मला म्हटले. घरात वडिलधारी पुरुष नाही असे माहित असलेला चोर असावा. तूं गप्प रहा आणि खाटे खाली जाऊन झोप.

त्यानंतर खिडकीजवळ माझ्या आईच्या नावाने हाक मारताना आम्हाला ऐकू आले. ती हाक मारणारी व्यक्ति दुसरी कोणी अनोळखी व्यक्ति नव्हती, तर पलायामकोट्टी या आमच्या घरापासून ७० कि.मि. दूर असलेल्या गावी पोलीस अधिकारी असलेले माझे सेल्वामनी मामा होते. आनंदाने आम्ही दार उघडले. त्यांनी नेहमी प्रमाणेच माझ्यासाठी बिस्कीटे, मिठाई,कपडे अशा भेट वस्तु आणल्या होत्या. जेव्हा मी एक विशिष्ट बॅग उघडली; त्यांत



मला एक बॉक्स दिसला. मी उस्तुकतेने तो बॉक्स उघडला तर त्यात पुष्कळ पेन्सिली आढळल्या. ('नटराज पेन्सिल' ज्या त्या काळात महागड्या पेन्सिल होत्या.) त्या एकूण २४ पेन्सिली होत्या.

सकाळी, मी आनंदाने तो २४ पेन्सिलींचा बॉक्स घेऊन शाळेला गेलो; जेव्हा इतर मुलांकडे केवळ एकच पेन्सिल होती. शिक्षिका रागीट चेहऱ्याने माझ्या जवळ आली आणि आनंदाचे कारण विचारु लागली. मी उत्तरा दाखल म्हटले जी पेन्सिल येण्याच्या मार्गावर होती. ती आश्चर्यकारक रित्या आज माझ्या हातात पोहचली. तिने माझ्या पाठीवर थाप मारुन खुष होऊन विद्यार्थ्यांना जाहिरपणे म्हटले; "एक जिवंत असा देव आहे, ज्याचे नाव येशू ख्रिस्त आहे."

प्रिय वाचकहो, हि घटना मी सात वर्षांचा असताना घडली; परंतु तो अनुभव आज देखील माझ्या मनात ताजा आहे. मला पेन्सिली पुरविणारा देव आज देखील जिवीत आहे. "**तो काल, आज हा युगानुयुग सारखाच आहे.**" (इ.ब्री. २३:८) त्यामुळे आज देखील मी माझ्या खोलीत एक छोटि चटई ठेविली आहे; जिला मी *"पेन्सिल चटई" असे म्हणतो. मी माझ्या व्यस्त अशा दिवसभराच्या कामातून तीन वेळा या चटईकडे जातो आणि त्याच येशू देवाकडे माझ्या गरजा मांडतो. आजपर्यंत अगदि सुई पासून ते अनेक मिनी बसेस, मोठी इमारत इत्यादि या "पेन्सिल चटई" द्वारे मला प्राप्त झाले आहे. त्यामुळे मी अशा निष्कर्षाप्रत आलो आहे कि, जे हात पवित्र बायबल हातात धरतात, जे गुडघे प्रार्थनेकरिता टेकले जातात ते कदापी अपयशी ठरणार नाहीत.*

त्यामुळे माझ्या ५५ वर्षांच्या सेवेच्या काळात, मी एक देखील निधी प्राप्तिसाठीची योजना आखली नाही किंवा व्यक्तिंच्या दारी जाऊन बहुविविध सेवाकार्यासाठी लागणाऱ्या गोष्टिंकरिता पैसा गोळा केला नाही. मला माझ्या देवाकडून माझ्या प्रत्येक गरजेकरिता, माझ्या "पेन्सिल चटई" वरुन मागितलेल्या गोष्टिंकरिता लागणारा निधी प्राप्त होतो.

"**मला सामर्थ्य देणाऱ्याच्या ठायी मी सर्व काही करावयास शक्तिमान आहे.**" (फिलिप्पै ४:१३)

(पान ६ वरुन...)

**टाकणार नाहीच.**" (इब्री १३:५). प्रभु परमेश्वर जाहिर करितो, "**त्याचे प्रेम मजवर आहे; म्हणून मी त्याला मुक्त करीन; त्याला माझ्या नामाची जाणीव आहे म्हणून मी त्याला उच्च स्थळी निर्भय ठेवीन. तो माझा धावा करील आणि मी त्याचे ऐकेन, संकट समयी मी त्याच्या जवळ असेन; मी त्याला मुक्त करीन, मी त्याचे गौरव करीन.**" (स्तोत्र ९१:१४-१५)

देव आमच्या त्रासाच्या समयात आमच्या सोबत अगदी जवळ रहाण्याचे आश्वासन देतो.

येशू आम्हांस त्याच्या सोबत आपले ओझे वाहाण्यास आमंत्रण देतो असे मत्तय ११:२८-३० या वचनात सांगण्यात आले आहे.

"**अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व मजकडे या, म्हणजे मी तुम्हांस विश्रांति देईन. मी जो मनाचा सौम्य व लीन आहे त्या माझे जूं आपणावर घ्या व मजपासून शिका, म्हणजे तुमच्या जिवांस विश्रांति मिळेल.**"

तो तयार आहे आणि आपण आपल्या चिंता, वेदना, अपयश आणि भय घेऊन त्याजकडे येऊन त्याजवर टाकण्याची वाट पाहात आहे. आज तुम्ही येणार कां आणि त्याला तुमची ओझी वाहण्यास देणार कां?

येशू आपली जीतकी ओझी वाहातो आणि आपल्याला मंडळीच्या कुटुंबाचा प्रार्थनेचा आधार आहे; आपण देखील कोणाच्या तरी जीवनासाठी 'योनाथान' बनण्याची संधी पाहावी.

## १. इतरांकरिता प्रार्थना करणे!

प्रार्थना एक सामर्थ्यशाली साधन आहे. आपण एकमेकांकरीता प्रार्थना करु शकतो. पापामध्ये धडपडत असलेला असा कोणीतरी तुमच्या नजरेत आला, तर त्याजवर टिका करण्या ऐवजी त्यांच्या करीता आणि त्यांच्या सोबत प्रार्थना करा. त्यांच्या सोबत चाला. कोणा बरोबर तुम्ही असंतुष्ट असाल, तर त्यांच्या बद्दल इतरांकडे कंड्या पिकविण्या पेक्षा त्यांच्या करीता प्रामाणीकपणे प्रार्थना करा.

## २. ऐकणे!

काहीवेळा लोकांना, कोणीतरी त्यांचे ऐकावे असे वाटत असते. त्यांच्या समस्यांकरीता मार्गदर्शन किंवा उपाय ते शोधीत नसतात. तर केवळ दयाळू कान. निर्णय देण्या ऐवजी केवळ ऐका. कदाचीत तुमच्या कुटुंबातील सदस्य असू शकतील किंवा एक मित्र, आणि कदाचित तुम्हाला वेदना दिलेली व्यक्ति असू शकेल. लोकांना गरज असते अशा वेळी एक उत्तम प्रकारे ऐकणारे बना.

## ३. भेट घेण्याची गरज!

याकोब आपणास शिकवितो की विश्वास हा कृति द्वारे प्रदर्शित केला पाहिजे. प्रार्थना आणि ऐकणेच केवळ पुरेसे नाहि; तर त्यांच्या गरजा पुरविण्यासाठी व्यावहारीक मार्ग देखील शोधला पाहिजे. यासाठी नेहमीच पैशांची गरज नसते, आपण आपले कौशल्य, नैपुण्य आणि ज्ञानाचा आधार देण्यास आणि मार्गदर्शनासाठी उपयोगात आणू शकतो.

## ४. तंत्रज्ञान –

तंत्रज्ञानाचा उद्येशाकरिता वापर करा. कोणी कठीण समयांतून जात असेल तर त्याला एखादा फोन वरुन लिखीत किंवा ध्वनिमुद्रीत संदेश पाठवा. प्रार्थना किंवा आत्मिक-मानसिक उन्नतीचा संदेश पाठवा; तुम्ही जरी प्रत्यक्षात त्यांच्याकडे जाऊ शकत नसला; तुमचे शब्दांचा प्रभावी परिणाम घडणार बायबलमधील वचन किंवा साधा संदेश देऊन धडपडत असलेल्यांना उत्तेजन प्राप्त होऊ शकते.

## ५. मंडळीतील लोकांची काळजी घेणे!

तुमच्या मंडळीतील लोकांच्या स्थितीची चौकशी करण्याची सवय असू द्या. मंडळीत जर एकाद्याची अनुपस्थिती जाणवत असेल तर त्यांना दूरध्वनि करा. मी तुमच्याकरिता प्रार्थना करु शकतो कां, असे त्यांना विचारा? आपल्या बंधु-बहिणींना हे कळू द्या की ते कुटुंबाचा भाग आहेत.

## ६. सेवा करणे!

येशू ख्रिस्ताने जशी सेवा केली. तशीच सेवा तुम्ही देखील करण्यासाठी उपलब्ध असा. सेवेसाठी अमर्याद संधी उपलब्ध आहेत; परंतु त्यासाठी एकमेकींची ओझी वाहाण्यासाठी आणि देवाची लेकरे या नात्याने असलेल्या पाचारणास शोभेल असे जगण्यास मार्ग शोधणे महत्त्वाचे आहे.


## पाहिजेत

**प्राचार्य (प्रिन्सीपल)**

**चैनईमध्ये आलेली ख्रिश्चन मेट्रीक्युलेशन स्कूल साठी**

**सेवेविषयी चांगली दूरदृष्टि, अनुभवी, समर्पितपणा, मेहनती आणि मिशन लक्षी ख्रिस्ती उमेदवाराची गरज आहे.**

**अर्ज करा :**

E.mail: biblecor@yahoo.co.in
WhatsApp: (+91) 97908 05460

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## Echo of His Call

**YouTube**
**Please subscribe**

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks.
**- Editor**

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th NOVEMBER 2024.**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**